।। श्रीगुरू :शरणम् ।।

।। ॐ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीदत्तवासुदेवाय नमः ।।

ॐ

# श्रीमन् महादेवशंकर विरचित

## सार्थ

# श्रीदत्तात्रेयवज्रकवच स्तोत्र

।। श्रीगुरू:शरणम् ।।

।।ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः ।।

**प्रास्ताविक :-**

शक्तिपाताचार्य सिद्धमहायोगी सद्गुरूनाथ श्रीसंत वामन दत्तात्रेय गुळवणीमहाराज यांच्या अपार कृपेने श्रीरूद्रयामलांतर्गत श्रीमहादेवशंकर विरचित “श्रीदत्तात्रेयज्रकवचस्तोत्र” हे स्वतंत्रपणे सुबोध मराठी अर्थासह प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे, ही परमभाग्याची गोष्ट आहे.

सर्व साधकभक्तांच्या पाठांतराच्या सोयीसाठी मुळातील सर्व स्तोत्र प्रथम दिले असून त्यानंतर पुन्हा त्यातील एक-एक श्लोक त्यांचे सुबोध भाषांतरही दिले आहे. त्यामुळे सकाळ किंवा संध्याकाळच्या अनुष्ठानाव्यतिरिक्तच्या काळात त्याचे वाचन केले असता आपण जे स्तोत्र म्हणत आहोत त्याचा अर्थ समजण्यास मदत होईल.

श्रीदत्तात्रेय हे स्मरणमात्राने संतुष्ट होणारे व महाभय निवारण करणारे चतुर्युगातील सर्वश्रेष्ठ असे दैवत आहे. एकदा श्रीदलादन महामुनींनी “श्रीदत्तात्रेय हे “स्मरणमात्रसंतुष्टाय” आहेत काय?” याची प्रचीती किंवा परीक्षा पाहण्यासाठी त्यांचे स्मरण केले असता श्रीदत्तात्रेयांनी त्यांना तत्काळ दर्शन दिले. भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या स्मर्तुगामित्वाची व स्मरणमात्रसंतुष्ट होण्याची प्रचीती येताच श्रीदलादनमुनींना आपल्या अपराधाची लाज वाटून त्यांनी त्यांची क्षमा मागितली. त्यावेळी भगवान् श्रीदत्तात्रेयांनी “तुला पाहिजे असेल ते माग” असा त्यांना वर दिला; परंतु “मला काही मागावयाचे नाही. आपल्या मनात जे असेल किंवा आपणास जे योग्य वाटेल ते आपण मला द्यावे” असे श्रीदलादनमुनींनी त्यांना सांगताच सर्व लोकांच्या कल्याणासाठीच श्रीदत्तात्रेयांनी त्यांना हे “श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्र” अर्पण केले आणि या स्तोत्रपठणापासून मिळणाऱ्या अमोघ फलप्राप्तीचे माहात्म्यही कथन केले. असे हे अपूर्व स्तोत्र आहे.

आजच्या या घोर कलियुगात नित्यनैमित्तिक कर्मे प्राय: लुप्त झाल्यामुळे मनुष्याला आपले जीवन सबल व यशस्वी करण्यासाठी काही आधारच उरला नाही. अशा स्थितीत त्याला जय, लाभ, यश, कीर्ती, धन, धान्य, संपत्ती व सर्व सुखाची प्राप्ती होऊन त्याच्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात आणि त्याचे सर्व रोग, बाधा, क्लेश, संकटे, अनर्थ, ताप, पाप, दैन्य, शत्रुभय, ग्रहपीडा इत्यादि सर्व प्रकारची दु:खे व संसारबंधने नाहीशी होऊन त्याला शांती व मोक्षप्राप्ती व्हावी म्हणून श्रीदत्तात्रेयांनी हे स्तोत्र श्रीदलादन महामुनींना दिले आहे.

या "श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्राच्या" नित्यपाठाने किंवा जपाने ऐहिक व पारलौकिक अशा सर्व कामना पूर्ण होऊन तो भक्त श्रीदत्तमहाराजांना अत्यंत प्रिय होतो. श्रीदत्तमहाराज आपणास प्रिय वाटणे व आपण श्रीदत्तमहाराजांना प्रिय होणे या दोन गोष्टीच मनुष्य जन्माचे सार्थक करणाऱ्या आहेत व याच्यासाठीच परब्रह्मपरमात्मा श्रीदत्तात्रेयांनी आपणाला अत्यंत दुर्लभ असा मनुष्य जन्म दिला आहे.

या दोन्ही गोष्टी या स्तोत्रपाठाने व निरंतर जपाने सिद्ध होतात असे स्वत: श्रीदत्तमहाराजच म्हणतात. त्यामुळे याबद्दल अधिक विचार करण्याचे कारण नाही. नित्यनियमाने प्रात:काळी किंवा सायंकाळी शुचिर्भूत होऊन केव्हाही या स्तोत्राचा जप करता येतो व काळाचे सार्थक होते. नाहीतर काळ हा सूर्यरूपाने आपले आयुष्य घेऊन चाललाच आहे. याकरिता आपले आयुष्य फुकट जाऊ नये व आपले सर्वतोपरी कल्याण व्हावे म्हणून विचारी माणसाने या स्तोत्राचा शक्य तितका जप करून आपला उद्धार करून घ्यावा.

सारांश, सर्व प्रकारच्या संसारतापांनी तप्त झालेल्या व घोर संकटात सापडलेल्या साधकभक्तांना प्राप्त तापातून व संकटातून पार पाडून त्यांना श्रीदत्तप्रीती म्हणजे अप्राकृत भक्ती प्राप्त व्हावी म्हणून भगवान् श्रीमहादेव शंकरांनी ही जी स्तोत्रवल्ली किंवा स्तोत्रमहौषधी उपलब्ध करून दिली आहे, तिचा सर्वांनी लाभ घ्यावा व जीवन कृतार्थ करावे, अशी श्रीगुरूचरणी अखंड प्रार्थना आहे.

## आरती



**त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।। त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।। नेति नेति शब्द न ये अनुमाना ।। सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ।। १ ।। जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता ।। आरती ओंवाळितां हरली भवचिंता ।। धृ० ।। सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ।। अभाग्यासी कैची न कळे ही मात ।। पराही परतली तेथे कैंचा हेत ।। जन्ममरणाचांही पुरलासे अंत ।। जय० ।। २ ।। दत्त येऊनियां उभा ठाकला ।। साष्टांग नमनें प्रणिपात केला ।। प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला ।। जन्ममरणाचा बा फेरा वांचविला ।। जय० ।। ३ ।। दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान । हरपलें मन झालें उन्मन ।। मी तूंपणासी झाली बोळवण ।। एका जनार्दनी दत्त हा जाण ।। जय० ।। ४ ।।**

# ।। अथ श्रीदत्तात्रेय वज्रकवच प्रारंभ ।।

।। श्रीगणेशाय नमः ।।

।। श्रीदत्तात्रेयाय नमः ।। ऋषय ऊचुः ।।
कथं संकल्पसिद्धिः स्याद्वेदव्यास कलौ युगे ।
धर्मार्थकाममोक्षाणां साधनं किमुदाहृतम् ।। १ ।।
व्यास उवाच ।।
शृण्वन्तु ऋषयः सर्वे शीघ्रं संकल्पसाधनम् ।
सकृदुच्चारमात्रेण भोगमोक्षप्रदायकम् ।। २ ।।
गौरीशृंगे हिमवतः कल्पवृक्षोपशोभितम् ।
दीप्ते दिव्यमहारत्नहेममंडपमध्यगम् ।। ३ ।।
रत्नसिंहासनासीनं प्रसन्नं परमेश्वरम् ।
मंदस्मितमुखांभोजं शंकरं प्राह पार्वती ।। ४ ।।
श्रीदेव्युवाच ।।
देवदेव महादेव लोकशंकर शंकर ।
मंत्रजालानि सर्वाणि यंत्रजालानि कृत्स्नशः ।। ५ ।।
तंत्रजालान्यनेकानि मया त्वत्तः श्रुतानि वै ।
इदानीं द्रष्टुमिच्छामि विशेषेण महीतलम् ।। ६ ।।
इत्युदीरितमाकर्ण्य पार्वत्या परमेश्वरः ।
करेणामृज्य संतोषात्पार्वतीं प्रत्यभाषत ।। ७ ।।
मायेदानीं त्वया सार्धं वृषमारूह्य गम्यते ।
इत्युक्त्वा वृषमारूह्य पार्वत्या सह शंकरः ।। ८ ।।
ययौ भूमंडलं द्रष्टुं गौर्याश्चित्राणि दर्शयन् ।
क्वचित् विध्याचलप्रान्ते महारण्ये सुदुर्गमे ।। ९ ।।
तत्र व्याहर्तुमायान्तं भिल्लं परशुधारिणम् ।
वर्ध्यमानं महाव्याघ्रं नखदंष्ट्राभिरावृतम् ।। १० ।।
अतीव चित्रचारित्र्यं वज्रकायसमायुतम् ।
अप्रयन्तमनायासमखिन्नं सुखमास्थितम् ।। ११ ।।
पलायन्तं मृगं पश्चाद्व्याघ्रो भीत्या पलायितः ।

एतदाश्चर्यमालोक्य पार्वती प्राह शंकरम् ।। १२ ।।
श्रीपार्वत्युवाच ।।
किमाश्चर्यं किमाश्चर्यमग्रे शंभो निरीक्ष्यताम् ।
इत्युक्तः सततः शंभुर्दृष्ट्वा प्राह पुराणवित् ।। १३ ।।
श्रीशंकर उवाच ।।
गौरी वक्ष्यामि ते चित्रमवाङ्मानसगोचरम् ।
अदृष्टपूर्वमस्माभिर्नास्ति किंचिन्न कुत्रचित् ।। १४ ।।
मया सम्यक् समासेन वक्ष्यते शृणु पार्वति ।
अयं दूरश्रवा नाम भिल्लः परमधार्मिकः ।। १५ ।।
समित्कुशप्रसूनानि कंदमूलफलादिकम् ।।
प्रत्यहं विपिनं गत्वा समादाय प्रयासतः ।। १६ ।।
प्रिये पूर्वं मुनींद्रेभ्यः प्रयच्छति न वांछति ।
तेऽपि तस्मिन्नपि दयां कुर्वते सर्वमौनिनः ।। १७ ।।
दलादनो महायोगी वसन्नेव निजाश्रमे ।
कदाचिद्स्मरत् सिद्धं दत्तात्रेय दिगम्बरम् ।। १८ ।।
दत्तात्रेयः स्मर्तृगामी चेतिहासं परीक्षितुम् ।
तत्क्षणात् सोऽपि योगींद्रो दत्तात्रेय उपस्थितः ।। १९ ।।
तद् दृष्ट्वाऽऽश्चर्यतोषाभ्यां दलादनमहामुनिः ।
संपूज्याग्रे निषीदन्तं दत्तात्रेयमुवाच तम् ।। २० ।।
मयोपहूतः संप्राप्तो दत्तात्रेय महामुने ।
स्मर्तृगामी त्वमित्येतत् किंवदन्ती परीक्षितुम ।। २१ ।।
मयाद्य संस्मृतोऽसि त्वमपराधं क्षमस्व मे ।
दत्तात्रेयो मुनिं प्राह मम प्रकृतिरीदृशी ।। २२ ।।
अभक्त्या वा सुभक्त्या वा यः स्मरेन्मामनन्यधीः ।
तदानीं तमुपागत्य ददामि तदभीप्सितम् ।। २३ ।।
दत्तात्रेयो मुनिं प्राह दलादनमुनीश्वरम् ।
यदिष्टं तद्वृणीष्व त्वं यत् प्राप्तोऽहं त्वया स्मृतः ।। २४ ।।
दत्तात्रेयं मुनिः प्राह मया किमपि नोच्यते ।
त्वच्चित्ते यत्स्थितं तन्मे प्रयच्छ मुनिपुंगव ।। २५ ।।
श्रीदत्तात्रेय उवाच ।।

ममास्ति वज्रकवचं गृहाणेत्यवदन्मुनिम् ।
तथेत्यंगीकृतवते दलादनमुनये मुनिः ।। २६ ।।
स्ववज्रकवचं प्राह ऋषिच्छन्दः पुरःसरम् ।
न्यासं ध्यानं फलं तत्र प्रयोजनयशेषतः ।। २७ ।।

अस्य श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्रमंत्रस्य, किरातरूपी महारूद्र ऋषिः, अनुष्टुप् छन्दः, श्रीदत्तात्रेयो देवता, द्रां बीजम्, आं शक्तिः, क्रौं कीलकम्, ॐ आं आत्मने नमः ।। ॐ द्रीं मनसे नमः ।। ॐ आं द्रीं श्रीं षौः ॐ क्लां क्लीं क्लूं क्लैं क्लैं क्लः ।। श्रीदत्तात्रेयप्रसादसिद्ध्यर्थे जपे विनियोगः ।। अथ करन्यासः ।। ॐ द्रां अंगुष्ठाभ्यां नमः ।। ॐ द्रीं तर्जनीभ्यां नमः ।। ॐ द्रुं मध्यमाभ्यां नमः ।। ॐ द्रैं अनामिकाभ्यां नमः ।। ॐ द्रौं कनिष्ठिकाभ्यां नमः ।। ॐ द्रः करतलकरपृष्ठाभ्यां नमः ।।

अथ हृदयादिन्यासः ।। ॐ द्रां हृदयाय नमः ।। ॐ द्रीं शिरसे स्वाहा ।। ॐ द्रुं शिखायै वषट् ।। ॐ द्रैं कवचाय हुं ।। ॐ द्रौं नेत्रत्रयाय वौषट् ।। ॐ द्रः अस्त्राय फट् ।। ॐ भूर्भुवःस्वरोमिति दिग्बंधः ।।

अथ ध्यानम् ।।

जगदंकुरकंदाय सत्त्चिदानंदमूर्तये ।
दत्तात्रेयाय योगीन्द्रचन्द्राय परमात्मने ।। १ ।।
कदा योगी कदा भोगी कदा नग्नः पिशाचत् ।।
दत्तात्रेयो हरिः साक्षाद्भुक्तिमुक्तिप्रदायकः ।। २ ।।
वाराणसीपुरस्नायी कोल्हापुरजपादरः ।
माहुरीपुरभिक्षाशी सह्यशायी दिंगबरः ।। ३ ।।
इन्द्रनीलसमाकारश्चन्द्रकांतिसमद्युतिः ।
वैडूर्यसदृशस्फूर्तिश्चलत्किंचिज्जटाधरः ।। ४ ।।
स्निग्धधावल्ययुक्ताक्षोऽतयंतनीलकनीनिकः ।
भ्रूवक्षःश्मश्रुनीलांकः शशांकसदृशाननः ।। ५ ।।
हासनिर्जितनीहारः कंठनिर्जितकंबुकः ।

मांसलांसो दीर्घबाहु: पाणिर्निर्जितपल्लव: ।। ६ ।।
विशालपीनवक्षाश्च ताम्रपाणिर्दलोदर : ।
पृथुलश्रोणिललितो विशालजघनस्थल: ।। ७ ।।
रंभास्तंभोपमानोरूर्जानुपूर्वैकजंघक: ।
गूढगुल्फ: कूर्मपृष्ठो लसत्पादोपरिस्थल: ।। ८ ।।
रक्तारविंदसदृशरमणीयपदाधर: ।
चर्माम्बरधरो योगी स्मर्तुगामी क्षणे क्षणे ।। ९ ।।
ज्ञानोपदेशनिरतो विपद्धरणदीक्षित: ।
सिद्धासनसमासीन ऋजुकायो हसन्मुख: ।। १० ।।
वामहस्तेन वरदो दक्षिणेनाभयंकर: ।
बालोन्मत्तपिशाचीभि: क्वचिद्युक्त: परीक्षित: ।। ११ ।।
त्यागी भोगी महायोगी नित्यानन्दो निरंजन: ।
सर्वरूपी सर्वदाता सर्वग: सर्वकामद: ।। १२ ।।
भस्मोद्धलितसर्वाङ्गो महापातकनाशन: ।
भुक्तिप्रदो मुक्तिदाता जीवन्मुक्तो न संशय: ।। १३ ।।
एवं ध्यात्वाऽनन्यचित्तो मद्वज्रकवचं पठेत् ।
मामेव पश्यन्सर्वत्र स मया सह संचरेत् ।। १४ ।।

दिंगबरं भस्मसुगंधलेपनं
चक्रं त्रिशूलं गरूडं गदायुधम् ।
पद्मासनं योगिमुनीन्द्रवंदितं
दत्तेति नामस्मरणेन नित्यम् ।। १५ ।।

(अथ पंचोपचारै: संपूज्य, ॐ द्राम् इति १०८ वारं जपेत्)

ॐ दत्तात्रेय: शिर: पातु सस्त्राब्जेषु संस्थित: ।
भालं पात्वानसूयेयश्चद्रमंडलमध्यग: ।। १ ।।
कूर्चं मनोमय: पातु हं क्षं द्विदलपद्मभू: ।
ज्योतीरूपोऽक्षिणी पातु पातु शब्दात्मक: श्रुती ।। २ ।।
नासिकां पातु गंधात्मा मुखं पातु रसात्मक: ।
जिव्हां वेदात्मक: पातु दंतोष्ठौ पातु धार्मिक: ।। ३ ।।
कपोलावत्रिभू: पातु पात्वशेषं ममात्मवित् ।
स्वरात्मा षोडशाराब्जस्थित:स्वात्माऽवताद्गलम्

स्कन्धौ चन्द्रानुज: पातु भुजौ पातु कृतादिभू: ।
जत्रुणी उत्रुजित् पातु पातु वक्ष:स्थलं हरि: ।। ५ ।।
कादिठांतद्वादशारपद्मगो मरूदात्मक: ।
योगीश्वरेश्वर:पातु हृदयं हृदयस्थित: ।। ६ ।।
पार्श्वे हरि: पार्श्ववर्तो पातु पार्श्वस्थित: स्मृत: ।
हठयोगादियोगज्ञ: कुक्षी पातु कृपानिधि: ।। ७ ।।
डकारादिफकारान्तदशारसरसीरूहे ।
नाभिस्थले वर्तमानो नाभि वन्ह्यात्मकोऽवतु ।। ८ ।।
वन्हितत्त्वमयो योगी रक्षतान्मणिपूरकम् ।
कटिं कटिस्थब्रह्मांडवासुदेवात्मकोऽवतु ।। ९ ।।
वकारादिळकारान्तषट्पत्रांबुजबोधक: ।
जलतत्त्वमयो योगी स्वाधिष्ठानं ममावतु ।। १० ।।
सिद्धासनसमासीन ऊरू सिद्धेश्वरोऽवतु ।
वादिसांतचतुष्पत्रसरोरूहनिबोधक: ।। ११ ।।
मूलाधारं महीरूपो रक्षताद्वीर्यनिग्रही ।
पृष्ठं च सर्वत: पातु जानुन्यस्तकरांबुज: ।। १२ ।।
जंधे पात्ववधूतेंद्र: पात्वंघ्री तीर्थपावन: ।
सर्वांगं पातु सर्वात्मा रोमाण्यवतु केशव: ।। १३ ।।
चर्म चर्मांबर: पातु रक्तं भक्तिप्रियोऽवतु ।
मांस मांसकर: पातु मज्जांमज्जात्मकोऽवतु ।। १४ ।।
अस्थीनि स्थिरधी: पायान्मेधां वेधा: प्रपालयेत् ।
शुक्रं सुखकर: पातु चित्तं पातु दृढाकृति: ।। १५ ।।
मनोबुद्धिमहंकारं हृषीकेशात्मकोऽवतु ।
कर्मेंद्रियाणि पात्वीश: पातु ज्ञानेंद्रियाण्यज: ।। १६ ।।
बंधून् बंधूत्तम: पायाच्छत्रुभ्य: पातु शत्रुजित् ।
गृहारामधनक्षेत्रपुत्रादीञ्छंकरोऽवतु ।। १७ ।।
भार्यां प्रकृतिवित् पातु पश्वादीन्पातु शार्ङ्गभृत् ।
प्राणान्पातु प्रधानज्ञो भक्ष्यादीन्पातु भास्कर: ।। १८ ।।
सुखं चंद्रात्मक: पातु दु:खात् पातु परांतक: ।
पशुन्पशुपति: पातु भूतिं भूतेश्वरो मम ।। १९ ।।
प्राच्यां विषहर: पातु पात्वाग्नेय्यां मखात्मक: ।
याम्यां धर्मात्मक: पातु नेऋत्यां सर्ववैरिहृत् ।। २० ।।

वराह पातु वारूण्यां वायव्यां प्राणदोवतु ।
कौबेर्यां धनद पातु पात्वैशान्यां महागुरु ।। २१ ।।
ऊर्ध्वं पातु महासिद्ध पात्वधस्ताज्जटाधर ।
रक्षाहीनं तु यत्स्थानं रक्षत्वादिमुनीश्वर ।। २२ ।।
मालामंत्रजप: । हृदयादिन्यास: ।।
एतन्मे वज्रकवचं य: पठेच्छृणुयादपि ।
वज्रकायश्चिरंजीवी दत्तात्रेयोऽहमब्रुवम् ।। २३ ।।
त्यागी भोगी महायोगी सुखदु:खविवर्जित: ।
सर्वत्रसिद्धसंकल्पो जीवन्मुक्तोऽद्य वर्तते ।। २४ ।।
इत्युक्त्वाऽन्तर्दधे योगी दत्तात्रेयो दिगंबर: ।
दलादनोऽपि तज्जप्त्वा जीवन्मुक्त: स वर्तते ।। २५ ।।
भिल्लो दूरश्रवा नाम तदानीं श्रुतवानिदम् ।
सकृच्छ्वणमात्रेण वज्राङ्गोऽभवदप्यसौ ।। २६ ।।
इत्येतद्वज्रकवचं दत्तात्रेयस्य योगिन: ।
श्रुत्वाशेषं शम्भुमुखात् पुनरप्याह पार्वती ।। २७ ।।
पार्वत्युवाच ।।
एतत्कवचमाहात्म्यं वद विस्तरतो मम ।
कुत्र केन कदा जाप्यं किं यज्जाप्यं कथं कथम् ।। २८ ।।
उवाच शंभुस्तत्सर्वं पार्वत्या विनयोदितम् ।
श्रीशिव उवाच ।।
श्रृणु पार्वति वक्ष्यामि समाहितमनाविलम् ।। २९ ।।
धर्मार्थकाममोक्षाणामिदमेव परायणम् ।
हस्त्यश्वरथपादातिसर्वैश्वर्यप्रदायकम् ।। ३० ।।
पुत्रमित्रकलत्रादिसर्वसंतोषसाधनम् ।
वेदशास्त्रादिविद्यानां निधानं परमं हि तत् ।। ३१ ।।
सङ्गीतशास्त्रसाहित्यसत्कवित्वविधायकम् ।
बुद्धिविद्यास्मृतिप्रज्ञामतिप्रौढिप्रदायकम् ।। ३२ ।।
सर्वसंतोषकरणं सर्वदु:खनिवारणम् ।
शत्रुसंहारकं शी घ्रं यश:कीर्तिविवर्धनम् ।। ३३ ।।
अष्टसंख्या महारोगा: सन्निपातास्त्रयोदश ।
षण्णवत्यक्षिरोगाश्च विंशतिर्मेहरोगका: ।। ३४ ।।

अष्टादश तु कुष्ठानि गुल्मान्यष्टविधान्यपि ।
अशीतिर्वातरोगाश्च चत्वारिंशत्तु पैत्तिकाः ।। ३५ ।।
विंशति श्लेष्मरोगाश्च क्षयचातुर्थिकादयः ।
मंत्रयंत्रकुयोगाद्याः कल्पतंत्रादिनिर्मिताः ।। ३६ ।।
ब्रह्मराक्षसवेतालकूष्मांडादिग्रहोद्भवाः ।
संघजा देशकालस्थास्तापत्रयसमुत्थिताः ।। ३७ ।।
नवग्रहसमुद्भूतामहापातकसंभवाः ।
सर्वे रोगा प्रणश्यन्ति सहस्त्रावर्तनाद्ध्रुवम् ।। ३८ ।।
अयुतावृत्तिमात्रेण वंध्या पुत्रवती भवेत् ।
अयुताद्वितयावृत्त्या ह्यपमृत्युजयो भवेत् ।। ३९ ।।
अयुतत्रितयाच्चैव खेचरत्वं प्रजायते ।
सहस्त्रादयुतदार्वाक् सर्वकार्याणि साधयेत् ।। ४० ।।
लक्षावृत्त्या कार्यसिद्धिर्भवत्येव न संशयः ।। ४१ ।।
विषवृक्षस्यमूलेषु तिष्ठन् वै दक्षिणामुखः ।
कुरूते मासमात्रेण वैरिण विकलेंद्रियम् ।। ४२ ।।
औदुंबरतरोर्मूले वृद्धिकामेन जाप्यते ।
श्रीवृक्षमूले श्रीकामी तिंतिण्यां शांतिकर्मणि ।। ४३ ।।
ओजस्कामोऽश्वत्थमूले स्त्रीकामैः सहकारके ।
ज्ञानार्थी तुलसीमूले गर्भगेहे सुतार्थिभिः ।। ४४ ।।
धनार्थिभिस्तु सुक्षेत्रे पशुकामैस्तु गोष्ठके ।
देवालये सर्वकामैस्तत्काले सर्वदार्शितम् ।। ४५ ।।
नाभिमात्रजले स्थित्वा भानुमालोक्य यो जपेत् ।
युद्धे वा शास्त्रवादे वा सहस्त्रेण जयो भवेत् ।। ४६ ।।
कण्ठमात्रे जले स्थित्वा यो रात्रौ कवचं पठेत् ।
ज्वरापस्मारकुष्ठादितापज्वरनिवारणम् ।। ४७ ।।
यत्र यत्स्यात्स्थिरं यद्यत्प्रसन्न तन्निवर्तते ।
तेन तत्र हि जप्तव्यं ततः सिद्धिर्भवेद्ध्रुवम् ।। ४८ ।।
इत्युक्त्वा च शिवो गौर्यै रहस्यं परमं शुभम् ।
यः पठेत् वज्रकवचं दत्तात्रेयसमो भवेत् ।। ४९ ।।

एवं शिवेन कथितं हिमवत्सुतायै

**प्रोक्तं दलादमुनयेऽत्रिसुतेन पूर्वम् ।**

**य: कोऽपि वज्रकवचं पठतीह लोके**

**दत्तोपमश्चरति योगिवरश्चिरायु: ।।५० ।।**

**।। इति श्रीरूद्रयामले हिमवत्खंडे मंत्रशास्त्रे उपासनाकाण्डे शिवविजयसिद्धान्ते**

**उमामहेश्वरसंवादे श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्रं संपूर्णम् ।।**

**।। श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।।**

**।। इति श्रीदत्तात्रेयवज्रकवचम् ।।**

# ।। सार्थ श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्र ।।

**।। श्रीगणेशाय नम: ।।**

**।। श्रीदत्तात्रेयाय नम: ।। ऋषय ऊचु: ।।**

**कथं संकल्पसिद्धि: स्याद्वेदव्यास कलौ युगे ।**

**धर्मार्थकाममोक्षाणां साधनं किमुदाहृतम् ।। १ ।।**

**अर्थ :-** श्रीगणेशाय नम: । श्रीदत्तात्रेयाय नम:। ऋषिगण असे म्हणाले की, हे वेदव्यासमहर्षे! या कलियुगामध्ये आपल्या संकल्पाची किंवा (मनोरथांची) सफलता कशाने होते ? तसेच धर्मार्थकाममोक्ष हे चार पुरूषार्थ मिळविण्याचे साधन काय सांगितले आहे ? ।। १ ।।

**व्यास उवाच ।।**

**शृण्वन्तु ऋषय :सर्वे शीघ्रं संकल्पसाधनम् ।**

**सकृदुच्चारमात्रेण भोगमोक्षप्रदायकम् ।। २ ।।**

**अर्थ :-** श्रीव्यासमहर्षी म्हणाले-ऋषिगणहो ऐका संकल्पसिद्धी ताबडतोब करणारे व एकदाच उच्चार केल्याने भोग-मोक्ष देणारे असे साधन सांगतो. ।। २ ।।

**गौरीशृंगे हिमवत: कल्पवृक्षोपशोभितम् ।**

**दीप्ते दिव्यमहारत्नहेममंडपमध्यगम् ।। ३ ।।**

**रत्नसिंहासनासीनं प्रसन्नं परमेश्वरम् ।**

**मंदस्मितमुखांभोजं शंकरं प्राह पार्वती ।।४।।**

**अर्थ :-** हिमालयाच्या दिव्य अशा गौरीनामक शिखरावर ( पठारावर ) दिव्यरत्नमय सुवर्णमंडपामध्ये रत्नमय सिंहासनावर बसलेल्या प्रसन्नमुख परमनियंत्या व मंदस्मित करणाऱ्या श्रीशंकराला श्रीपार्वतीने पुढीलप्रमाणे प्रश्न केला. ।। ३-४ ।।

**श्रीदेव्युवाच ।।**

**देवदेव महादेव लोकशंकर शंकर ।**

**मंत्रजलानि सर्वाणि यंत्रजालनि कृत्स्नश: ।। ५ ।।**

**तंत्रजालान्यनेकानि मया त्वत्त: श्रृतानि वै ।**

**इदानीं द्रष्टुमिच्छामि विशेषेण महीतलम् ।। ६ ।।**

**अर्थ :-** श्रीपार्वतीदेवी असे म्हणाली की, हे देव श्रेष्ठा ! प्रभो महादेवा ! लोकहित करणाऱ्या श्रीशंकरा ! सर्व प्रकारच्या मंत्र-यंत्रांचा विस्तार (पसारा-जाळी) आणि अनेक तंत्रेही मी आपणाकडून ऐकिली. आता मी विशेषत्वाने भूमंडळ (पृथ्वीतल) पाहू इच्छिते. ।। ५-६ ।।

**इत्युदीरितमाकर्ण्य पार्वत्या परमेश्वर: ।**

**करेणामृज्य संतोषात्पार्वतीं प्रत्यभाषत ।। ७ ।।**

**मयेदानीं त्वया सार्थ वृषमारूह्य गम्यते ।**

**इत्युक्त्वा वृषमारूह्य पार्वत्या सह शंकर: ।। ८ ।।**

**ययौ भूमंडलं द्रष्टुं गौर्याश्चित्राणि दर्शयन् ।**

**क्वचित् विंध्याचलप्रान्ते महारण्ये सुदुर्गमे ।। ९ ।।**

**अर्थ :-** श्रीपार्वतीचे असे भाषण ऐकून, संतुष्ट झालेल्या श्रीशिवाने हाताने श्रीपार्वतीला गौरवपूर्वक शाबासकी दिली व ते तिला असे म्हणाले की, बरे, तर मग चला, आत्ताच आपण दोघे नंदीवर बसून निघू. असे म्हणून श्रीपार्वतीसह आरूढ होऊन श्रीमहादेव पृथ्वीवर आले व श्रीपार्वतीला अनेक चित्रविचित्र भूप्रदेश दाखवीत दाखवीत विंध्यपर्वताच्या पायथ्याशी असलेल्या अत्यंत दुर्गम अशा महारण्यात ( आले ) ।। ७-८ -९ ।।

**तत्र व्याहर्तुमायान्तं भिल्लं परशुधारिणम् ।**

**वर्ध्यमानं महाव्याघ्रं नखदंष्ट्राभियावृतम् ।। १० ।।**

**अर्थ :-** तेथे त्यांनी सहज विहारासाठी आलेल्या व कुऱ्हाड हातात घेतलेल्या अशा उंच्या-पुऱ्या शरीराच्या भिल्लास पाहिले. तेथेच त्यांना एक मोठा वाघ दिसला. त्याची नखे व दाढा अत्यंत भयप्रद होत्या. ।। १० ।।

**अतीव चित्रचारित्र्यं वज्रकायसमायुतम् ।**

**अप्रयन्तमनायासमखिन्नं सुखमास्थितम् ।। ११ ।।**

**पलायन्तं मृगं पश्चाद्व्या घ्रो भीत्या पलायित: ।**

**एतदाश्चर्यमालोक्य पार्वती प्राह शंकरम् ।। १२ ।।**

**अर्थ :-** तेथेच मजबूत शरीराचा एक मृग (हरिण) आरामात बसलेला, खुषीत असलेला व ताज्या दमात नाचतबागडत असलेला पार्वतीला दिसला. विशेष म्हणजे त्या हरिणाला पाहून एक मोठा वाघ भिऊन

धूम पळत सुटला होता. हे आश्चर्यकारक दृश्य पाहून ते श्रीपार्वतीदेवीने श्रीशंकरांना पुढीलप्रमाणे कथन केले. ।। ११-१२ ।।

**श्रीपार्वत्युवाच ।।**

**किमाश्चर्यं किमाश्चर्यमग्रे शंभो निरीक्ष्यताम् ।**

**इत्युक्त: सतत: शंभुर्दृष्ट्वा प्राह पुराणवित् ।। १३ ।।**

**अर्थ :-** श्रीपार्वतीदेवी श्रीशंकरांना असे म्हणाली की, हे महादेवा! जरा इकडे बघा तरी! काय आश्चर्य आहे! तेव्हा श्रीमहादेव तिकडे पाहून पूर्वेतिहास (जाणणारे) आठवून त्यांनी तो तिला पुढीलप्रमाणे कथन केला. ।। १३ ।।

**श्रीशंकर उवाच ।।**

**गौरी वक्ष्यामि ते चित्रमवाङ्मानसगोचरम् ।।**

**अदृष्टपूर्वमस्माभिर्नास्ति किंचिन्न कुत्रचित् ।। १४ ।।**

**अर्थ :-** श्रीशिव असे म्हणाले की, हे पार्वती ! मन वाणीला अगोचर असे आम्ही न पाहिलेले असे काहीही कोठेही नाही. ।। १४ ।।

**मया सम्यक् समासेन वक्ष्यते शृणु पार्वति ।**

**अयं दूरश्रवा नाम भिल्ल: परमधार्मिक: ।। १५ ।।**

**अर्थ :-** मी तुला थोडक्यात जे चांगले आहे ते सांगतो. ते तू श्रवण कर. हा दूरश्रवा नावाचा भिल्ल आहे. तो अत्यंत धर्माचरणी आहे. ।। १५ ।।

**समित्कुशप्रसूनानि कंदमूलफलादिकम् ।।**

**प्रत्यहं विपिनं गत्वा समादाय प्रयासत: ।। १६ ।।**

**प्रिये पूर्व मुनींद्रेभ्य: प्रयच्छति न वांछति ।**

**तेऽपि तस्मिन्नपि दयां कुर्वते सर्वमौनिन: ।। १७ ।।**

**अर्थ :-** हा दररोज अरण्यात जाऊन, मोठ्या प्रयत्नाने समिधा, दर्भ, फुले, कंदमूळ, फळे इत्यादि आणून तेथील मुनिवर्यांना देत असे; पण त्याच्या मोबदल्यात कशाचीही इच्छा करीत नसे आणि ते मुनीदेखील त्याच्यावर कृपादृष्टी करीत असत. ।। १६-१७ ।।

**दलादनो महायोगी वसन्नेव निजाश्रमे ।**

**कदाचिद्स्मरत् सिद्धं दत्तात्रेयं दिगम्बरम् ।। १८ ।।**

**अर्थ :-** एकदा श्रीदलादन (वनस्पतींची कोवळि दले खाणारे ) नावाच्या महायोगी महात्म्यांनी आपल्या आश्रमात सहज बसल्या-बसल्याच सिद्ध व दिगंबर अशा श्रीदत्तात्रेयांचे स्मरण केले. ।। १८ ।।

**दत्तात्रेय: स्मर्तुगामी चेतिहासं परीक्षितुम् ।**

**तत्क्षणात् सोऽपि योगींद्रो दत्तात्रेय उपस्थित: ।। १९ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय हे स्मरण करताच स्मरणकर्त्याकडे लगेच येतात, या ऐकीव इतिहासाची परीक्षा (खरेखोटेपण) पाहण्यासाठी (श्रीदलादनऋषींनी) हे स्मरण (केले) होते; पण त्याच क्षणाला ते योगिवर्य श्रीदत्तात्रेय तेथे प्रकट झाले. ।। १९ ।।

**तद् दृष्ट्वाऽऽश्चर्यतोषाभ्यां दलादनमहामुनिः ।**
**संपूज्याग्रे निषीदन्तं दत्तात्रेयमुवाच तम् ।। २० ।।**

**अर्थ :-** ते पाहून आश्चर्याने व आनंदाने श्रीदलादनमहर्षींनी आपल्या समोर त्यांना आसनावर बसवून त्यांचे पूजन केले व ते त्यांना असे म्हणाले की- ।। २० ।।

**मयोपहूतः संप्राप्तो दत्तात्रेय महामुने ।**
**स्मर्तृगामी त्वमित्येतत् किंवदन्ती परीक्षितुम् ।। २१ ।।**
**मयाद्य संस्मृतोऽसि त्वमपराधं क्षमस्व मे ।**
**दत्तात्रेयो मुनिं प्राह मम प्रकृतिरीदृशी ।। २२ ।।**

**अर्थ :-** हे प्रभो ! मुनिवर्या श्रीदत्तात्रेया !! आपण स्मर्तृगामी आहात, असे जे सर्वत्र (लोकात) प्रसिद्ध आहे, ते परीक्षून पाहण्यासाठी मी आपले स्मरण केले. या माझ्या अपराधाबद्दल आपण मला क्षमा करावी. तेव्हा श्रीदत्तात्रेय त्या मुनींना असे म्हणाले की, अरे ! माझा स्वभावच असा आहे. ।। २१-२२ ।।

**अभक्त्या वा सुभक्त्या वा यः स्मरेन्मामनन्यधीः ।**
**तदानीं तमुपागत्य ददामि तदभीप्सितम् ।। २३ ।।**

**अर्थ :-** अभक्तीने असो वा सद्भक्तीने असो, जो अनन्यभावाने माझे स्मरण करील, त्याच्याकडे मी त्याच क्षणी जाऊन त्याचे अपेक्षित त्याला देतो ।। २३ ।।

**दत्तात्रेयो मुनिं प्राह दलादेनमुनीश्वरम् ।**
**यदिष्टं तद्वृषीष्व त्वं यत् प्राप्तोऽहं त्वया स्मृतः ।। २४ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय त्या श्रीदलादनमुनिश्रेष्ठांना असे म्हणाले की, तुला जे इष्ट (पाहिजे असेल ते) माग; कारण तू स्मरण केलेस म्हणून मी आलो आहे. ।। २४ ।।

**दत्तात्रेयं मुनिः प्राह मया किमपि नोच्यते ।**
**त्वच्चित्ते यत्स्थितं तन्मे प्रयच्छ मुनिपुंगव ।। २५ ।।**

**अर्थ :-** श्रीदलादनमुनी श्रीदत्तात्रेयांना असे म्हणाले की, मला काही मागावयाचे नाही किंवा म्हणावयाचे नाही. आपल्या मनात जे असेल ( किंवा आपणास जे योग्य वाटेल ) ते आपण मला द्यावे. ।। २५ ।।

**श्रीदत्तात्रेय उवाच ।।**

**ममास्ति वज्रकवचं गृहाणेत्यवदन्मुनिम् ।**
**तथेत्यंगीकृतवते दलादनमुनये मुनिः ।। २६ ।।**

**अर्थ :-** हे ऐकताच श्रीदत्तात्रेय त्यांना असे म्हणाले की, माझे एक कवच आहे. त्याला वज्रकवच

म्हणतात. ते तू घ्यावेस. असे म्हणताच, बरे आहे, असे म्हणून श्रीदलादनमुनींनी त्यांना होकार दिला. ।। २६।।

**स्ववज्रकवचं प्राह ऋषिच्चन्द: पुर:सरम्।**
**न्यासं ध्यानं फलं तत्र प्रयोजनमशेषत: ।। २७ ।।**

**अर्थ:-** लगेच मुनिवर्य श्रीदत्तात्रेयांनी ऋषी, छंद, न्यास, ध्यान, फल व प्रयोजन यांसह स्वत:चे वज्रकवच त्यांना सांगितले. ।। २७ ।।

**अस्य श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्रमंत्रस्य, किरातरूपी महारूद्र ऋषि:, अनुष्टुप् छन्द:, श्रीदत्तात्रेयो देवता, द्रां बीजम्, आं शक्ति:, क्रौं कीलकम्, ॐ आं आत्मने नम: ।। ॐद्रीं मनसे नम:।। ॐ आं द्रीं श्रीं सौ: ॐ क्लां क्लीं क्लूं क्लैं क्लौं क्ल: ।। श्रीदत्तात्रेयप्रसादसिद्ध्यर्थे जपे विनियोग: ।।**

**अर्थ:-** या श्रीदत्तात्रेय वज्रकवचस्तोत्रमंत्राचा किरातरूपी (भिल्लरूपी) महारूद्र ऋषी आहे. छंद अनुष्टुप् आहे. श्रीदत्तात्रेय देवता आहे. द्रां हे बीज, आं ही शक्ती व क्रौं हे कीलक आहे. ॐ आं आत्मने नम: म्हणजे आत्मतत्त्वाला नमस्कार असो. ॐ द्रीं मनसे नम: म्हणजे मनस्तत्त्वाला नमस्कार असो. ॐ आं द्रीं श्रीं सौ: ॐ क्लां क्लीं क्लूं क्लैं क्लौं क्ल: ।।श्रीदत्तात्रेयाच्या प्रसन्नतेच्या प्राप्तीसाठी ( प्रसादसिद्धीसाठी ) हा जप करावा.

**अथ करन्यास:।।ॐ द्रां अंगुष्ठाभ्यां नम: ।।ॐ द्रीं**
**तर्जनीभ्यां नम: ।।ॐ द्रूं मध्यमाभ्यां नम: ।।ॐ द्रैं**
**अनामिकाभ्यां नम: ।।ॐ द्रौं कनिष्ठिकाभ्यां नम: ।।**
**ॐ द्र: करतलकरपृष्ठाभ्यां नम: ।।**

**अर्थ :-** आता पुढीलप्रमाणे दोन्ही हाताने न्यास करावेत. ॐ द्रां असे म्हणून दोन अंगठ्यांना तर्जनीने म्हणजे पहिल्या बोटाने स्पर्श करून नमस्कार करावा. ॐ द्रीं असे म्हणून दोन तर्जनींना अंगठ्याने स्पर्श करून नमस्कार करावा. ॐ द्रूं असे म्हणून दोन्ही मधल्या बोटांना अंगठ्याने स्पर्श करून नमस्कार करावा. ॐ द्रैं असे म्हणून अनामिकांना म्हणजे तिसऱ्या बोटांना व ॐ द्रौं असे म्हणून दोन्ही करंगळ्यांना अंगठ्याने स्पर्शपूर्वक नमस्कार करावा ॐ द्र: असे म्हणून दोन्ही तळहात एकमेकांवर फिरवून स्पर्शपूर्वक नमस्कार करावा.

**अथ हृदयादिन्यास: ।।ॐ द्रां हृदयाय नम: ।।ॐ**
**द्रीं शिरसे स्वाहा ।।ॐ द्रूं शिखायै वषट् ।।ॐ द्रैं कवचाय**
**हं ।।ॐ द्रौं नेत्रत्रयाय वौषट् ।।ॐ द्र: अस्त्राय फट् ।।**

**अर्थ:-** आता हृदय इत्यादि शरीराच्या भागांचे पुढीलप्रमाणे न्यास करावेत ॐ द्रां हृदयाय नम: असे म्हणून हृदयाला उजवा हात लावून नमस्कार करावा. ॐ द्रीं शिरसे स्वाहा असे म्हणून डोक्याला हात लावून

नमस्कार करावा. ॐ द्रूं शिखाय वषट् असे म्हणून शेंडीला हात लावून नमस्कार करावा. ॐ द्रैं कवचाय हुं असे म्हणून दोन्ही हात शरीराकडे वळवून व फिरवून नमस्कार करावा. ॐ द्रौं नेत्रत्रयाय वौषट् असे म्हणून उजव्या हाताच्या तर्जनीने उजव्या डोळ्याला, अनामिकेने डाव्या डोळ्याला व मध्यमेने आज्ञाचक्राला स्पर्श करून नमस्कार करावा. ॐ द्रः अस्त्राय फट् म्हणून उजव्या हताने चुटक्या वाजवीत डोक्याभोवती हात फिरवून डाव्या हातावर टाळी द्यावी.

**ॐ भूर्भुवस्वरोमिति दिग्बंधः ।।**

**अर्थ :-** ॐ भूर्भुवःस्वरोम् असे म्हणून ८-१० दिशांना अक्षता टाकून व नमन करुन दिग्बंधन करावे.

**।। अथ ध्यानम् ।।**

**जगदंकुरकंदाय सच्चिदानंदमूर्तये ।**
**दत्तात्रेयाय योगीन्द्रचन्द्राय परमात्मने ।। १ ।।**

**अर्थ :-** हे श्रीदत्तात्रेय हे जगद्रूपी अंकुराचे किंवा वृक्षाचे कंद अर्थात् मूळ आहेत. ते सत्, चित् व आनंदरूपी आहेत. ते योगिश्रेष्ठांमध्ये चंद्रासारखे शीतलप्रकाशी आहेत. त्यांना नमस्कार असो ।। १ ।।

**कदा योगी कदा भोगी कदा नग्नः पिशाचवत् ।**
**दत्तात्रेयो हरिः साक्षाद्भुक्तिमुक्तिप्रदायकः ।। २ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय हे एखाद्या वेळी योगी, एखाद्या वेळी भोगी म्हणजे विषयोपभोक्ते , एवाद्या वेळी दिगंबर म्हणजे वस्त्रहीन आणि एखाद्या वेळी पिशाच्चाप्रमाणे भासतात. हे श्रीदत्तात्रेय साक्षात् हरि म्हणजे भक्तदुःखहारक असे विष्णूच आहेत. हे भुक्ती व मुक्ती देणारे आहेत. ।। २ ।।

**वाराणसीपुरस्नायी कोल्हापुरजपादरः ।**
**माहुरीपुरभिक्षाशी सह्यशायी दिगंबरः ।। ३ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय हे काशीक्षेत्रातील भागीरथीत म्हणजे श्रीगंगेत स्नान करतात, कोल्हापुरात म्हणजे श्रीकरवीरक्षेत्री संध्याजपादि करतात, मातापुरात म्हणजे माहुरक्षेत्रात भिक्षा मागून भुकेची शांती करतात आणि सह्यपर्वतावर झोप वा विश्रांती घेतात. ।। ३ ।।

**इन्द्रनीलसमाकारश्चद्रकांतिसमद्युतिः ।**
**वैडूर्यसदृशस्फूर्तिश्चलत्किंचिज्जटाधरः ।। ४ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेयांचा वर्ण इंद्रनीलमण्याप्रमाणे आहे. त्यांची अंगकांती चंद्राप्रमाणे शीतल व मोहक असून वैडूर्यरत्नाप्रमाणे त्यांचे तेज उमलणारे अर्थात् सर्वत्र पसरणारे आहे. त्यांचा जटाभार किंचित् सैल, चंचल व हलणारा आहे. ।। ४ ।।

**स्निग्धधावल्यक्ताक्षोऽत्यंतनीलकनीनिकः ।**
**भ्रूवक्षःश्मश्रुनीलांकः शशांकसदृशाननः ।। ५ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेयांचे डोळे शुभ्र व स्नेहाळ असून त्यातील बाहुल्या अत्यंत निळ्या आहेत. त्यांच्या

भिवया, छाती व मिशांचे केस किंचित् निळसर आहेत. त्यांचे मुख चंद्राप्रमाणे आकर्षक आहे. ।।५।।

**हासनिर्जिनीहार: कंठानिर्जितकंबुक: ।**
**मांसलांसो दीर्घबाहु: पाणिर्निर्जितपल्लव: ।। ६ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेयांच्या हास्याने कमलांना जिंकले आहे. त्यांच्या कंठाने शंखाला लाजविले आहे. त्यांचे खांदे भरीव व पुष्ट आहेत, हात गुडघ्यापर्यंत लांब आहेत आणि करतल हे पल्लवाहून कोवळे किंवा नाजूक आहेत. ।। ६ ।।

**विशालपीनवक्षाश्च ताम्रपाणिर्दलोदर: ।**
**पृथुलश्रोणिललितो विशालजघनस्थल: ।। ७ ।।**
**रंभास्तंभोपमानोरूर्जानुपूर्वैकजंघक: ।**
**गूढगुल्फ: कूर्मपृष्ठो लसत्पादोपरिस्थल: ।। ८ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेयांची छाती रूंद व पुष्ट आहे. तळहात तांबूस आहेत, त्यांचा उदरभाग पाकळीप्रमाणे पातळ आहे. त्यांचा कटिभाग रुंद व सुंदर आहे आणि जंघा भरीव व मोठ्या आहेत. त्यांच्या मांड्या केळीच्या बुंध्याप्रमाणे गोल व वर्तुळाकार आहेत. त्यांचे गुडघे आणि पोटऱ्या स्पष्ट दिसतात; मात्र त्यांचे घोटे मांसल असल्याने स्पष्ट दिसत नाहीत. त्यांची पाठ कासवाच्या पाठीसारखी थोडी फुगीर आहे आणि त्यांचे पादपृष्ठ सुंदर व किंचित् उंच म्हणजे फुगीर असे आहेत. ।। ७-८ ।।

**रक्तारविंदसदृशरमणीयपदाधर: ।**
**चर्माम्बरधरो योगी स्मर्तुगामी क्षणे क्षणे ।। ९ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेयांचे तळपाय व ओठ तांबड्या कमलाप्रमाणे रक्तवर्ण आहेत. ते हरिणव्याघ्रादिप्राण्यांची कातडी वस्त्राप्रमाणे वापरतात. ते योगनाथ अर्थात् योगिश्रेष्ठ आहेत. ते क्षणोक्षणी आठवण करताच धांवून येणारे आहेत. ।। ९ ।।

**ज्ञानोपदेशनिरतो विपद्धरणदीक्षित: ।**
**सिद्धासनसमासीन ऋजुकायो हसन्मुख: ।। १० ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय ज्ञानोपदेश करण्यात रमलेले, भक्तांची संकटे हरण करण्याची दीक्षा घेतलेले, सिद्धासनात सदा बसणारे, देह सरळ ठेवणारे, मंद हास्य करणारे व हसऱ्या चेहऱ्याचे आहेत. ।। १० ।।

**वामहस्तेन वरदो दक्षिणेनाभयंकर: ।**
**बालोन्मत्तपिशाचीभि: क्वचिद्युक्त: परीक्षित: ।। ११ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय डाव्या हाताने वर देतात व उजव्या हाताने अभय देतात. श्रीदत्तात्रेयांसारख्या महापुरूषाच्या भोवती लहान मुले, उनाड-उन्मत्त मुले व पिशाचवृत्तीची माणसे किंवा भूते क्वचित् प्रसंगी वेढा देऊन असतात. श्रीदत्तात्रेयांची दृष्टी चौकस, सावध व परीक्षा करणारी आहे. ।। ११ ।।

**त्यागी योगी महाभोगी नित्यानन्दो निरंजन: ।**

**सर्वरूपी सर्वदाता सर्वग: सर्वकामद: ।। १२ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय हे विरक्त आहेत, भोगासक्तही आहेत आणि महान् योगीही आहेत. तसेच ते सदैव आत्मनंदात असतात. त्याचप्रमाणे ते निरंजन अर्थात् निर्लेप म्हणजे दोषरहित आहेत. ते सर्वस्वरुपी, सर्व देणारे, सर्वत्र गमनशील व सर्व इच्छा पुरविणारे आहेत. ।। १२ ।।

**भस्मोद्धूलितसर्वाङ्‌गो महापातकनाशन: ।**

**भुक्तिप्रदो मुक्तिदाता जीवन्मुक्तो न संशय: ।। १३ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेय हे सर्व शरीराला नेहमी भस्म लावतात. ते मोठमोठ्या पातकांचा नाश करतात. भोगेच्छूना भोग ( भोग्यविषय ) देतात व ( मुमुक्षूंना ) मोक्ष देऊन मुक्त करतात. ते स्वत: जीवनमुक्त आहेत हे नि:संशय समजावे. ।। १३ ।।

**एवं ध्यात्वाऽनन्यचितो मद्वज्रकवचं पठेत् ।**

**मामेव पश्यन्सर्वत्र स सया सह संचरेत् ।। १४ ।।**

**अर्थ :-** माझे ( श्रीदत्तात्रेयाचे ) असे रूप ध्यानात आणून हे वज्रकवच पठण करावे व मला अर्थात् श्रीदत्तात्रेयांना सर्वत्र पाहावे व मला मनात ठेवून (माझ्याबरोबर) सर्वत्र खुशाल फिरावे अर्थात् संचार करावा. ।। १४ ।।

**दिगंबरं भस्मसुगंधलेपनं**
**चक्रं त्रिशूलं गरुडं गदायुधम् ।**
**पद्मासनं योगिमुनीन्द्रवंदितं**
**दत्तेति नामस्मरणेन नित्यम् ।। १५ ।।**

**अर्थ :-** पूर्वादि दिशा हे ज्यांचे वस्त्र आहे म्हणजे जे दिगंबर किंवा नग्न आहेत, ज्यांच्या देहावर सुंगधी भस्माचा ( गंधाप्रमाणे ) लेप आहे. ज्यांच्या हातात चक्र, त्रिशूळ व गदा आहे, ज्यांच्या जवळ गरुड आहे, जे नेहमी पद्मासनात बसतात किंवा ज्यांचे आसन कमळांचे आहे आणि योगिवर्य मुनिवर्य ज्यांना वंदन करतात अशा श्रीदत्तात्रेयांचे नामस्मरण करीत नित्य संचार करावा. ।। १५ ।।

**( अथ पंचोपचारै: संपूज्य, ॐ द्राम् इति १०८ वारं जपेत् )**

**अर्थ :-** यानंतर पंचोपचारांनी ( गंध, अक्षता, फुले धूप व नैवेद्यांनी ) श्रीदत्तात्रेयांचे पूजन करुन 'ॐद्राम्' असा १०८ वेळा जप करावा. ।। १६ ।।

**दत्तात्रेय: शिर: पातु सहस्त्राब्जेषु संस्थित: ।**

**भालं पात्वानसूयेयश्चंद्रमंडलमध्यग: ।। १ ।।**

**अर्थ :-** मस्तकातील सहस्त्रदलीय कमळात राहणारे श्रीदत्तात्रेय माझ्या मस्तकाचे रक्षण करोत. चंद्रमंडळात राहणारे अनसूयेचे पुत्र श्रीदत्तात्रेय हे माझ्या भालप्रदेशाचे म्हणजे कपाळाचे रक्षण करोत. ।। १ ।।

**कूर्चं मनोमय: पातु हं क्षं द्विदलपद्मभू: ।**

**ज्योतीरूपोऽक्षिणी पातु पातु शब्दात्मक: श्रुती ।। २ ।।**

**अर्थ :-** मनोमय असणारे श्रीदत्तात्रेय हे माझ्या हनुवटीचे रक्षण करोत. हं व क्षं या बीजाक्षरांच्या रूपाने द्विदलकमलात म्हणजे आज्ञाचक्रात राहणारे श्रीदत्तात्रेय हे आमचे रक्षण करोत. ज्योति:स्वरूपधारी श्रीदत्तात्रेय हे माझ्या दोन डोळ्यांचे रक्षण करोत. शब्दरूपी श्रीदत्तात्रेय हे माझ्या दोन कानांचे रक्षण करोत. ।। २ ।।

**नासिकां पातु गंधात्मा मुखं पातु रसात्मक: ।**
**जिव्हां वेदात्मक: पातु देतोष्ठौ पातु धार्मिक: ।। ३ ।।**

**अर्थ :-** गंधात्मा म्हणजे सुगंधात राहणारे श्रीदत्तात्रेय हे माझ्या नाकाचे रक्षण करोत. रसात्मा श्रीदत्तात्रेय हे माझ्या मुखाचे रक्षण करीत. वेदात्मा श्रीदत्तात्रेय हे माझ्या जिव्हेचे व धार्मिक श्रीदत्तात्रेय हे माझ्या दातांचे व ओठांचे रक्षण करोत. ।। ३ ।।

**कपोलावत्रिभू: पातु पात्वशेषं ममात्मवित् ।**
**स्वरात्मा षोडशाराब्जस्थित: स्वात्माऽवताद्‌गलम् ।। ४ ।।**

**अर्थ :-** श्रीअत्रीऋषींपासून उत्पन्न झालेले श्रीदत्तराज हे माझ्या गालांचे ( दोन गालांचे ) रक्षण करोत. आत्मवेत्ते श्रीदत्तात्रेय सर्वदृष्ट्या माझ्या सर्वांगाचे रक्षण करोत. १ ६ पाकळ्यांच्या कमळात (मस्तकस्थ मेंदूत) राहणारे स्वररूप आत्मा असलेले श्रीदत्तात्रेय हे माझ्या गळ्याचे रक्षण करोत. ।। ४ ।।

**स्कन्धौ चन्द्रानुज: पातु भुजौ पासु कृतादिभू: ।**
**जत्रुणी शत्रुजित् पातु पातु वक्ष:स्थलं हरि: ।। ५ ।।**

**अर्थ :-** चंद्राचा बंधू असलेले श्रीदत्तात्रेय हे माझ्या दोन्ही खांद्यांचे रक्षण करीत. कृतादियुगांच्या आधी असणारे किंवा झालेले श्रीदत्तात्रेय हे माझ्या भुजांचे रक्षण करोत. शत्रूंना जिंकणारे श्रीदत्तात्रेय हे माझ्या खांद्यांच्या सांध्यांचे रक्षण करीत. हरिरुप श्रीदत्तात्रेय हे माझ्या छातीचे ( वक्ष: स्थलाचे ) रक्षण करोत. ।। ५ ।।

**कादिठातद्वादशापद्मगो मरूदात्मक: ।**
**योगीश्वरेश्वर:पातु हृदयं हृदयस्थित: ।। ६ ।।**

**अर्थ :-** ककारापासून ठकरापर्यंतच्या बारा पाकळ्यांच्या कमळात राहणारे हे श्रीदत्तात्रेय वायुरूपी आहेत. ते माझे प्राणरक्षण करोत. योगीश्वरेश्वर श्रीदत्तात्रेय हे हृदयात राहणारे आहेत. ते माझ्या हृदयाचे रक्षण करोत. ।। ६ ।।

**पार्श्वे हरि: पार्श्ववर्ती पातु पार्श्वस्थित: स्मृत: ।**
**हठयोगादियोगज्ञ: कुक्षी पातु कृपानिधि: ।। ७ ।।**

**अर्थ :-** पार्श्ववती म्हणजे बरगड्यात राहणारे श्रीदत्तात्रेय हे माझ्या बरगड्यांचे रक्षण करोत. हठयोगादियोगांना जाणणारे कृपानिधी श्रीदत्तात्रेय हे माझ्या दोन्ही कुशींचे म्हणजे पोटाचे रक्षण करोत. ।। ७ ।।

**डकारादिफकारान्तदशारसरसीरूहे ।**
**नाभिस्थले वर्तमानो नाभि वन्ह्यात्मकोऽकतु ।। ८ ।।**

**अर्थ :-** डकारापासून फकारपर्यन्त असलेल्या दहा शब्दांनी युक्त अशा दहा पाकळ्यांच्या कमलरूपी नाभिस्थानात राहणारे अग्निरूपी प्रभू श्रीदत्तात्रेय हे माझ्या नाभीचे रक्षण करोत. ।। ८ ।।

**वन्हितत्त्वमयो योगी रक्षतान्मणिपूरकम् ।**
**कटिं कटिस्थब्रह्मांडवासुदेवात्मकोऽवतु ।। ९ ।।**

**अर्थ :-** अग्नितत्त्वमय योगी श्रीदत्तात्रेय हे माझ्या मणिपूर चक्राचे रक्षण करोत. कटिस्थानीय ब्रह्मांडमय श्रीवासुदेवप्रभू श्रीदत्तात्रेय हे माझ्या कंबरेचे रक्षण करोत. ।। ९ ।।

**वकारादिळकारान्तषट्पत्रांबुजबोधक : ।**
**जलतत्त्वमयो योगी स्वाधिष्ठानं ममावतु ।। १० ।।**

**अर्थ :-** वकारपासून ल (ळ) कारापर्यन्त असलेल्या अशा सहा शब्दांनी अंकित असलेल्या सहा पाकळ्यांच्या कमळास जागे करणारे जलतत्त्वमय योगी श्रीदत्तात्रेय हे माझ्या स्वाधिष्ठानचक्राचे पालन करोत. ( स्वकार्य करण्याची स्फूर्ती देवोत.) ।। १० ।।

**सिद्धासनसमासीन उरू सिद्धेश्वरोऽवतु ।**
**वादिसांतचतुष्पत्रसरोरूहनिबोधक : ।। ११ ।।**

**अर्थ :-** सिद्धासनात असणारे व सिद्धांचे नियंते अर्थात् ( नियामक प्रभू ) श्रीदत्तात्रेय हे माझ्या मांड्यांचे रक्षण करोत. वकारापासून सकारपर्यंतच्या चार शब्दांनी अंकित असलेल्या अशा चार पाकळ्यांच्या पद्मास हे श्रीदत्तात्रेय प्रफुल्लित करतात अर्थात् उमलवितात ।। ११ ।।

**मूलाधारं महीरूपो रक्षताद्वीर्यनिग्रही ।**
**पृष्ठं च सर्वत : पातु जानुन्यस्करांबुज : ।। १२ ।।**

**अर्थ :-** पृथ्वीरूपी वीर्य किंवा शुक्राचा निरोध करणाऱ्या अर्थात् रक्षण करणाऱ्या अशा श्रीदत्तात्रेयांनी माझ्या मूलाधाराचे रक्षण करावे. गुडघ्यांवर हात ठेवून बसलेले हे श्रीदत्तात्रेय सर्वबाजूंनी माझ्या पृष्ठभागाचे रक्षण करोत. ।। १२ ।।

**जंघे पात्ववधूतेंद्र : यात्वंघ्री तीर्थपावन : ।**
**सर्वांगं पातु सर्वात्मा रोमाण्यवतु केशव : ।। १३ ।।**

**अर्थ :-** अवधूतांमध्ये श्रेष्ठ असे हे श्रीदत्तात्रेय हे माझ्या पोटऱ्यांचे रक्षण करोत. तीर्थांनाही पावन करणार श्रीदत्तात्रेय माझ्या पायांचे म्हणजे दोन्ही चरणांचे रक्षण करोत. सर्वस्वरूपी श्रीदत्तात्रेयांनी माझ्या सर्वांगाचे अर्थात् सर्व अवयवांचे रक्षण करोत. केशवस्वरूपी श्रीदत्तात्रेयांनी माझ्या अंगावरील रोमांचे म्हणजे केसांचे रक्षण करावे. ।। १३ ।।

**चर्मचर्मांबर : पातु रक्तं भक्तिप्रियोऽवतु ।**
**मांसंमांसकर : पातु मज्जांमज्जात्मकोऽवतु ।। १४ ।।**

**अर्थ :-** ( वाघाचे ) कातडे पांघरणारे प्रभू श्रीदत्तात्रय हे माझ्या चर्माचे रक्षण करोत. भक्तिप्रिय श्रीदत्तात्रेय हे माझ्या रक्ताचे रक्षण करोत. मांसल अर्थात् पुष्ट हातांच्या श्रीदत्तात्रेय देवांनी माझे मांसरक्षण करावे. मज्जात्म्याने मज्जेचे म्हणजे माझ्या शरीरातील सर्व नाड्यांचे रक्षण करावे. ।। १४ ।।

**अस्थीनि स्थिरधी : पायान्मेधां वेधा : प्रपालयेत् ।**

**शुक्रं सुखकर : पातु चित्तं पातु दृढाकृति : ।। १५ ।।**

**अर्थ :-** स्थिर बुद्धीच्या श्रीदत्तात्रेयांनी माझ्या अस्थींचे रक्षण करावे. सृष्ट्युत्पादक श्रीदत्तात्रेयांनी माझ्या धारणाशक्तीचे रक्षण करावे. सुख देणारे श्रीदत्तात्रेय हे माझ्या शुक्राचे अर्थात् वीर्याचे रक्षण करोत. बळकट शरीरी श्रीदत्तात्रेयांनी माझ्या चित्ताचे रक्षण करावे. ।। १५ ।।

**मनोबुद्धिमहंकारं हृषीकेशात्मकोऽवतु ।**

**कर्मेंद्रियाणि पात्वीश : पातु ज्ञानेंद्रियाण्यज : ।। १६ ।।**

**अर्थ :-** हृषीकेशात्मक श्रीदत्तात्रेयांनी माझ्या मनाचे, बुद्धीचे व अहंकाराचे रक्षण करावे. ईशाने कर्मेंद्रियांचे आणि अजाने म्हणजे जन्मरहित अशा श्रीदत्तात्रेयांनी माझ्या ज्ञानेंद्रियांचे रक्षण करावे. ।। १६ ।।

**बंधून् बंधूत्तम : पायाच्छत्रुभ्य : पातु शत्रुजित् ।**

**गृहारामधनक्षेत्रपुत्रादींछंकरोऽवतु ।। १७ ।।**

**अर्थ :-** जीवलगश्रेष्ठ व बंधुश्रेष्ठ श्रीदत्तात्रेयांनी आमच्या बांधवांचे म्हणजे बंधिसमुदायाचे रक्षण करावे. शत्रूंना पराभूत करणाऱ्या या ईश्वराने शत्रूपासून आमचे रक्षण करावे. शंकारानी अर्थात् कल्याण करणाऱ्या श्रीदत्तात्रेयांनी आमचे घर, बाग, बगीचा, शेतीवाडी व पुत्रादिकांचे रक्षण करावे. ।। १७ ।।

**भार्यां प्रकृतिवित् पातु पश्वादीन्पातु शाङर्गभृत् ।**

**प्राणान्पातु प्रधानज्ञो भक्ष्यादिन्पातु भास्कर : ।। १८ ।।**

**अर्थ :-** त्रिगुणात्मक प्रकृतीचे ज्ञाते श्रीदत्तात्रेय माझ्या भार्येचे रक्षण करोत. शाङ्र्गधनुर्धारी श्रीदत्तात्रेय माझे गायी, घोडे इत्यादि पशूंचे रक्षण करीत. प्रधानरूपी पुरूषाला जाणणारे श्रीदत्तात्रेय आमच्या पंचप्राणांचे रक्षण करोत. भास्कराने अर्थात् प्रकाशकर्त्या श्रीदत्तात्रेयांनी आमच्या भक्ष्यपदार्थाचे रक्षण करावे. ।। १८ ।।

**सुखं चंद्रात्मक : पातु दु:खात् पातु परांतक : ।**

**पशुन्पशुपति : पातु भूतिं भूतेश्वरो मम ।। १९ ।।**

**अर्थ :-** चंद्रात्मक श्रीदत्तात्रेयांनी माझ्या सुखाचे रक्षण करावे. पुरातकांनी म्हणजे त्रिपुरातकांनी अर्थात् श्रीशिवशंकस्वरूपी श्रीदत्तात्रेयांनी दु:खापासून आमचे रक्षण करावे. पशुपतींनी पशूंचे व भूतेश्वरान अर्थात् पृथ्वादिभूतस्वामींनी म्हणजे श्रीदत्तात्रेयांनी माझ्या ऐश्वर्याचे ( श्रीमंतीचे ) रक्षण करावे. ।। १९ ।।

**प्राच्यां विषहर : पातु पात्वाग्नेय्यां मखात्मक : ।**

**याम्यां धर्मात्मक : पातु नैऋत्यां सर्ववैरिहृत् ।। २० ।।**

**अर्थ :-** विषनाशक श्रीदत्तात्रेय हे पूर्व दिशेला माझे रक्षण करोत. यंत्ररूपी श्रीदत्तात्रेय हे अग्नेयदिशेला माझे रक्षण करोत. यमधर्मरूपाने श्रीदत्तात्रेय दक्षिणेला व सर्ववैरिनाशक श्रीदत्तात्रेय नैऋत्येस माझे रक्षण करोत. ।। २० ।।

**वराह : पातु वारूण्यां वायव्यां प्राणदोऽवतु ।**

**कौबेर्यां घनद : पातु पात्वैशान्यां महागुरू : ।। २१ ।।**

**अर्थ :-** श्रीदत्तात्रेयांनी वराहरूपाने पश्चिमेला व प्राणदात्या श्रीदत्तात्रेयांनी वायव्यदिशेला माझे रक्षण करीत. उत्तरदिग्भागी कुबेरूपाने आणि ईशान्यदिग्भागी महागुरू शिवरूपाने श्रीदत्तात्रेयांनी माझे रक्षण करोत. ।। २१ ।।

**ऊर्ध्वं पातु महासिद्धः पात्वधस्ताज्जटाधरः ।**
**रक्षाहीनं तु यत्स्थानं रक्षत्वादिमुनीश्वरः ।। २२ ।।**

**अर्थ:-** ऊर्ध्वभागी महासिद्धरूपाने व अधोभागी जटाधारी प्रभुरूपाने श्रीदत्तात्रेयांनी आमचे रक्षण करावे. जे स्थान रक्षणाच्या यादीतून राहिले असेल त्याचे रक्षण मुनीश्वरांमध्ये पहिले असलेल्या व अग्रभागी असणाऱ्या श्रीदत्तात्रेयांनी करावे ।। २२ ।।

**मालामंत्रजपः ।हृदयादिन्यासः ।।**

**अर्थ:-** यानंतर मालामंत्रजप करावा. (ॐ द्राम् १०८ वेळा म्हणावे.) व हृदयादिन्यास करावेत ॐ द्राम् हृदयाय नमः । ॐ द्रीम् शिरसे स्वाहा । ॐ द्रूम शिखायै वषट् । ॐ द्रैम् कवचाय हुम् । ॐ द्रौम् नेत्रत्रयाय वौषट् ।ॐ द्रः अस्त्राय फट् ।

**एतन्मे वज्रकवचं यः पठेच्छृणुयादपि ।**
**वज्रकायश्चिरंजीवी दत्तात्रेयोऽहमब्रुवम् ।। २३ ।।**

हे माझे वज्रकवच जो पठण करील किंवा निदान श्रवण करील (तरीही) तो दृढशरीरी होईल. तो चिरंजीव होईल व पुष्कळ दिवस जगेल. अल्पायू होणार नाही व अकाली मरणार नाही. हे मी स्वतः दत्तात्रेय सांगतो आहे. ।। २३ ।।

**त्यागी भोगी महायोगी सुखदुःखविवर्जितः ।**
**सर्वत्रसिद्धसंकल्पो जीवन्मुक्तोऽद्य वर्तते ।। २४ ।।**

**अर्थ:-** ( हे माझे वज्रकवच जो पठण करील किंवा निदान श्रवण करील) तो विरक्त होईल, विषयभोक्ता होईल व महान् योगी होईल, त्याला सुख-दुःखे होणार नाहीत. त्याचे संकल्प कोठेही सिद्ध अर्थात् पूर्ण होतील. तो जीवन्मुक्तच आहे असे समजा. ।। २४ ।।

**इत्युक्वाऽन्तर्दधे योगी दत्तात्रेयो दिगंबरः ।**
**दलादनोऽपि तज्जप्त्वा जीवनमुक्तः स वर्तते ।। २५ ।।**
**भिल्लो दूरश्रवा नाम तदानीं श्रुतवानिदम् ।**
**सकृच्छ्वणमात्रेण वज्राङ्गोऽभवदप्यसौ ।। २६ ।।**

**अर्थ:-** असे बोलून श्रीदिगंबर योगिराज दत्तप्रभू अंतर्धान पावले अर्थात् गुप्त झाले. त्या (या) वज्रकवचाचे पठणजपादि करून श्रीदलादनमुनीही जीवन्मुक्त झाले. श्रीदलादनमुनींचे वज्रकवचपठण त्या दूरश्रवाभिल्लाने एकदाच ऐकून तो वज्रशरीरी झाला. ।। २५-२६ ।।

**इत्येतद्वज्रकवचं दत्तात्रेयस्य योगिनः ।**
**श्रुत्वाशेषं शम्भुमुखात् पुनरप्याह पार्वती ।। २७ ।।**

**अर्थ:-** श्रीशंभुदेवांच्या मुखाने श्रीयोगीवर्यदत्तात्रेयांचे हे वज्रकवच पूर्णतया ऐकून श्रीपार्वतीने त्यांना पुढील प्रमाणे प्रश्न विचारले. ।। २७ ।।

**पार्वत्युवाच ।।**
**एतत्कवचमाहात्म्यं वद विस्तरतो मम ।**

**कुत्र केन कदा जाप्यं किं यज्जप्यं कथं कथम् ।। २८ ।।**

**अर्थ :-** श्रीपार्वतीदेवाने असे प्रश्न विचारले की, हे शिवा! या कवचाचे माहात्म्य मला विस्ताराने सांगा. कोणी, कोठे व केव्हा याचा जप करावा ? आणि कसा व किती करावा ? ।। २८ ।।

**उवाच शंभुस्तत्सर्व पार्वत्या विनयोदितम् ।**

**श्रीशिव उवाच ।।**

**श्रृणु पार्वति वक्ष्यामि समाहितमनाविलम् ।। २९ ।।**

**अर्थ :-** श्रीपार्वतीने विनयाने विचारलेल्या सर्व प्रश्नांचे उत्तर श्रीशंभूमहादेवांनी पुढीलप्रमाणे दिले. ते असे म्हणाले की, तुला सर्व स्पष्ट व विस्तृत सांगतो ते तू श्रवण कर. ।। २९ ।।

**धर्मार्थकाममोक्षाणामिदमेव परायणम् ।**

**हस्त्यश्वरथपादातिसर्वैश्वर्यप्रदायकम् ।। ३० ।।**

**अर्थ :-** धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरूषार्थ या कवचामुळे सहज मिळतात. हत्ती, घोडे, रथ व पायदळ इत्यादि सर्व ऐश्वर्य या कवचामुळे मिळते. ।। ३० ।।

**पुत्रमित्रकलत्रादिसर्वसंतोषसाधनम् ।**

**वेदशास्त्रादिविद्यानां निदानं परमं हि तत् ।। ३१ ।।**

**अर्थ :-** पुत्रमित्रकलत्रांदिकांचा लाभ या कवचामुळे होतो. वेदशास्त्रादि सर्व विद्यांचे हे आगार आहे अर्थात् या श्रीदत्तात्रेयवज्रकवचामुळे सर्वविद्यांचा लाभ होतो. ।। ३१ ।।

**सङ्गीतशास्त्रसाहित्यसत्कवित्वविधायकम् ।**

**बुद्धिविद्यास्मृतिप्रज्ञामतिप्रौढिप्रदायकम् ।। ३२ ।।**

**अर्थ :-** या वज्रकवचामुळे संगीत व साहित्याचा लाभ होतो व सुंदर काव्य अर्थात् कवित्व रचना मनुष्य करू शकतो. धारणाशक्ती, विद्या, स्मरणशक्ती व बुद्धी अर्थात् मती यात त्याला प्रौढी मिळते.।। ३२।।

**सर्वसंतोषकरणं सर्वदु:खनिवारणम् ।**

**शत्रुसंहारकं शीघ्रं यश:कीर्तिविवर्धनम् ।। ३३ ।।**

**अर्थ :-** हे श्रीदत्तात्रेयवज्रकवच सर्व संतोषकारक असून हे सर्व दु:खनाशक आहे. हे वज्रकवच शत्रूंचा शीघ्र नि:पात करणारे असून यश व कीर्ती वाढविणारे आहे. ।। ३३ ।।

**अष्टसंख्या महारोगा: सन्निपातास्त्रयोदश ।**

**षण्णवत्यक्षिरोगाश्च विंशतिर्मेहरोगका: ।। ३४ ।।**

**अर्थ :-** या श्रीदत्तात्रेयवज्रकवचामुळे आठ प्रकाराचे महारोग, तेरा तऱ्हेचे संनिपात, शहाण्णव रीतीचे नेत्ररोग अर्थात् डोळ्यांच्या व्याधी आणि वीस तऱ्हेचे महारोग नष्ट होतात. ।। ३४ ।।

**अष्टादश तु कुष्ठानि गुल्मान्यष्टविधान्यपि ।**
**अशीतिर्वातरोगाश्च चत्वारिशत्तु पैत्तिका: ।। ३ ५ ।।**
**विंशाति श्लेष्मरोगाश्च क्षयचातुर्थिकादय: ।**
**मंत्रयंत्रकुयोगाद्या: कल्पतंत्रादिनिर्मिता: ।। ३ ६ ।।**
**ब्रह्मराक्षसवेतालकूष्मांडादिग्रहोद्‌भवा: ।**
**संघजा देशकालस्थास्तापत्रयसमुत्थिता: ।। ३ ७ ।।**
**नवग्रहसमुद्‌भूता महापातकसंभवा: ।**
**सर्वे रोगा प्रणश्यन्ति सहस्त्रावर्तनाद्ध्रुवम् ।। ३ ८ ।।**

**अर्थ :-** या श्रीदत्तात्रेयवज्रकवचामुळे अठरा कुष्ठे व आठ प्रकारचा गुल्म ( उदररोगविशेष । तसेच ऐंशी वातरोग, चाळीस पित्तरोग आणि वीस कफरोग तसेच क्षयरोग, चातुर्थिकादिज्वर, दुष्टमंत्र, दुष्टयंत्र, वाईट योग वगैरे जे कल्पतंत्रादिकात सांगितले आहेत ते आणि ब्रह्मराक्षस, वेताळ, कुष्माण्डदिग्रहांमुळे होणाऱ्या पीडा, सहभोजन, आसन, वस्त्रधारणादि समुदायोत्पन्न व्याधी, देशकालोत्पन्न प्लेग, महामारी त्रिविधतापांमुळे होणाऱ्या पीडा, शनी, राहू, इत्यादि नवग्रहांच्या पीडा आणि महापातकामुळे होणारा जाच हे सर्व याच कवचाच्या हजार आर्वतनाने पूर्ण नष्ट होतात. ।। ३ ५-३ ६ -३ ७ - ३ ८ ।।

**अयुतावृत्तिमात्रेण वंध्या पुत्रवती भवेत् ।**
**अयुतद्वितयावृत्त्या ह्यपमृत्युजयो भवेत् ।। ३ ९ ।।**

**अर्थ :-** या श्रीदत्तात्रेयवज्रकवचाच्या केवळ दहा हजार आवर्तनाने वंध्येला पुत्र होतील आणि वीस हजार आवर्तने केल्यास अकालमृत्यू, अपमृत्यू अर्थात् अपघातीमृत्यू टळेल. ।। ३ ९ ।।

**अयुतत्रितयाच्चैव खेचरत्वं प्रजायते ।**
**सहस्त्रादयुतादर्वाक् सर्वकार्याणि साधयेत् ।। ४० ।।**
**लक्षावृत्त्या कार्यसिद्धिर्भवत्येव न संशय: ।। ४१ ।।**

**अर्थ :-** या श्रीदत्तात्रेयवज्रकवचाच्या तीस हजार आवृत्तींनी खेचरत्व, देवत्व म्हणजे गगनातून चालणे अर्थात् निराधार गमनशक्ती प्राप्त होईल. सहस्त्रात्, अयुतात्, अर्वाक् म्हणजे हजारो पाठानी म्हणजे लक्षसंख्यादि पाठांनी कामे ( सर्व इच्छा ) पूर्ण होतील अशाप्रकारे या श्रीदत्तात्रेयवज्रकवचाचे लक्ष पाठ केल्याने कार्यसिद्धी होतेच यात काहीही संशय नाही. अर्थात् हे नि:संशय आहे. ४०-४१

**विषवृक्षस्यमूलेषु तिष्ठन् वै दक्षिणामुख: ।**
**कुरूते मासमात्रेण वैरिण विकलेंद्रियम् ।। ४२ ।।**

**अर्थ :-** विषवृक्षाच्या ( रूई, कुचला वगैरे ) झाडाच्या खाली दक्षिणाभिमुख उभे राहून हे श्रीदत्तात्रेयवज्रकवच जपल्यास शत्रू विकलेंद्रिय, लुळा, पांगळा, मुका, बहिरा, आंधळा वगैरे व दुबळा होतो. ।।४२ ।।

**औदुंबरतरोर्मूले वृद्धिकामेन जाप्यते ।**

**श्रीवृक्षमूले श्रीकामी तिंतिण्यां शांतितर्मणि ।। ४३ ।।**

**अर्थ :-** बुद्धीची इच्छा करणाऱ्याने औदुंबर ( उंबराच्या वृक्षाच्या खाली राहून म्हणजे बसून हे वज्रकवच जपावे. बिल्ववृक्षाच्या मुळाशी बसून श्रीकामान् म्हणजे लक्ष्मी इच्छिणाऱ्याने हे वज्रकवच जपावे. शान्तिकर्मात चिंचेच्या झाडाखाली बसून जपावे. ।। ४३ ।।

**ओजस्कामोऽश्वत्थमूले स्त्रीकामै : सहकारके ।**

**ज्ञानार्थी तुलसीमूले गर्भगेहे सुतार्थिभि : ।। ४४ ।।**

**अर्थ :-** ओजस्विता व तेजस्विता इच्छिणाऱ्याने पिंपळाखाली बसून हे वज्रकवच म्हणावे अर्थात् जपावे. पत्नी इच्छिणाऱ्यांनी आम्रवृक्षाखाली बसून जपावे. ज्ञानेच्छूने तुलसीखाली (जवळ) बसून हे वज्रकवच जपावे. पुत्रेच्छूने तळघरात बसून जपावे. ।। ४४ ।।

**धनार्थिभिस्तु सुक्षेत्रे पशुकामैस्तु गोष्ठके ।**

**देवालये सर्वकामैस्तत्काले सर्वदर्शितम् ।। ४५ ।।**

**अर्थ :-** धर्मार्थी लोकांनी सुक्षेत्रात ( आपल्या शेतात किंवा तीर्थक्षेत्रात ) या वज्रकवचाचा जप करावा. ( गाई, म्हशी इत्यादि ) पशूंची इच्छा करणाऱ्यांनी गोठ्यामध्ये हे वज्रकवच म्हणावे. सर्वेच्छू लोकांनी म्हणजे वाटेल ते योग्य इच्छिणाऱ्यांनी देवालयात बसून हे वज्रकवच म्हणावे. अशा रीतीने स्थल, काल, कामना, जपसंख्या इत्यादि सर्व सांगितले. ।। ४५ ।।

**नाभिमात्रजले स्थित्वा भानुमालोक्य यो जपेत् ।**

**युद्धे वा शास्त्रवादे वा सहस्रेण जयो भवेत् ।। ४६ ।।**

**अर्थ :-** नाभीपर्यंत खोल अशा पाण्यात उभे राहून सूर्याकडे पाहात पाहात किंवा पाहून जो हे वज्रकवच जपदृष्ट्या म्हणेल तो युद्धात हजारो योद्ध्यांना जिंकेल व शास्त्रवादात शेकडो पंडितांना निरूत्तर करील. अर्थात् विजयी होईल. ।। ४६ ।।

**कण्ठमा जले स्थित्वा यो रात्रौ कवचं पठेत् ।**

**ज्वरापस्मारकुष्ठादितापज्वरनिवारणम् ।। ४७ ।।**

**अर्थ :-** आकण्ठपाण्यात उभे राहून रात्री जे हे वज्रकवच पठण करील त्याचे ज्वर, फेफरे, कुष्ठादि त्वचारोग व संनिपातज्वर वगैरे सर्व दूर होतात अर्थात नष्ट होतात. ।। ४७ ।।

**यत्र यत्स्यात्स्थिरं यद्यत्प्रसन्नं तन्निवर्तते ।**

**तेन तत्र हि जप्तव्यं तत : सिद्धिर्भवेद्ध्रुवम् ।। ४८ ।।**

**अर्थ :-** जेथे ज्याचे चित्त स्थिर व प्रसन्न राहील व हे वज्रकवच म्हणावेसे वाटेल तेथे त्याने या कवचाचा जप करावा. त्यामुळे कार्यसिद्धी निश्चित होते. ।। ४८ ।।

**इत्युक्त्वा च शिवो गौर्यै रहस्यंपरमं शुभम् ।**
**य: पठेत् वज्रकवचं दत्तात्रेयसमो भवेत् ।। ४९ ।।**

**अर्थ**:- असे सांगून पुन्हा श्री शिवप्रभू श्रीपार्वतीदेवीस असे म्हणाले की, तुला परम मंगल रहस्य (गौप्य) म्हणून असे सांगतो की, जो हे वज्रकवच पठण करील तो श्रीदत्तात्रेयांसारखा प्रतिदत्तात्रेय होईल. ।।४९।।

**एवं शिवेन कथितं हिमवत्सुतायै**
**प्रोक्तं दलादमुनयेऽत्रिसुतेन पूर्वम् ।**
**य: कोऽपि वज्रकवचं पठतीह लोके**
**दत्तोपमश्चरति योगिवरश्चिरायु: ।। ५० ।।**

**अर्थ**:- अशा रीतीने श्रीशिवांनी श्रीपादर्वतीला अर्थात् हिमगिरिकन्यकेला जे सांगितले ते श्रीदलादनमुनींना श्रीअत्रिपुत्र श्रीदत्तात्रेयांनी पूर्वीच सांगितले होते. या मृत्यूलोकी जो कोणी हे पठण करील तो श्रीदत्तात्रेयांप्रमाणे दीर्घायू होईल, योगीश्रेष्ठ होईल व कोठेही अनिर्बंध संचार करील. ।। ५० ।।

**।। इति श्रीरूद्रयामले हिमवत्खंडे मंत्रशास्त्रे उपासनाकाण्डे शिवविजयसिद्धान्ते उमामहेश्वरसंवादे श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्रं संपूर्णम् ।।**

# ।। इति श्रीदत्तात्रेयवज्रकवचम् ।।

**अर्थ**:- अशा रीतीने श्रीरूद्रयामलतंत्रांतर्गत हिमवत खंडामधील मंत्रशास्त्राच्या उपासनाकाण्डातील शिवविजयसिद्धान्तयुक्त असे श्रीउमामहेश्वरसंवादरूपाने प्रकट झालेले श्रीदत्तात्रेयवजकवचस्तोत्र संपूर्ण झाले.

श्रीदत्तात्रेयांना सर्व अर्पण असो.

श्रीदत्तात्रेयवज्रकवच समाप्त